कळव्याच्या काही भागांत आज वीज नाही

लोकसत्ता प्रतिनिधी

ठाणे : कळवा शहरात टोरंट पॉवर कंपनीतर्फे शनिवारी सकाळी वीजवाहिनीच्या दुरूस्ती आणि निगराणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे कळवा शहराच्या काही भागांतील वीजपुरवठा सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत खंडीत राहणार आहे.

कळवा शहरात टोरंट पॉवर कंपनीकडून विद्युत पुरवठा केला जातो. शनिवारी येथील वीजवाहिन्यांच्या दुरूस्ती आणि निगराणीचे काम हाती घेतले जाणार आहे. त्यामुळे येथील आतकोनेश्वर नगर, सफायर रुग्णालय, भास्कर नगर, पौंड पाडा, घोलाई नगर, आनंद विहार संकुल, अपर्णा राज सोसायटी, कोकणेश्वर पार्क, शिवशक्ती नगर, गुलमोहर, स्टॅन्डर्ड केमिकल, म्हात्रे कंपाऊंड, शिवशक्ती नगर या भागांचा विद्युत पुरवठा सकाळी खंडीत राहणार आहे, असे टोरंट पॉवर कंपनीतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

'लोकसत्ता दुर्गा' पुरस्कारासाठी माहिती पाठविण्याचे आवाहन

शोध भवतालातील स्त्रीशक्तीचा

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : विविध क्षेत्रांत उत्तुंग आणि समाजाभिमुख कार्यामुळे असामान्य ठरणाऱ्या, सामान्य नागरिकांमधील नऊ 'दुर्गां'चा 'लोकसत्ता'तर्फे नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही गौरव करण्यात येणार आहे. यंदा 'लोकसत्ता दुर्गा पुरस्कार- २०२१' चे आठवे वर्ष असून आपल्या परिसरातील अशा कर्तृत्ववान स्त्रियांची माहिती 'लोकसत्ता'कडे पाठवण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

अनेक स्त्रिया छोट्या स्वरूपात एखादे विधायक कार्य सुरू करतात आणि पुढे त्याचा विस्तार वाढून मोठे रचनात्मक काम उभे राहते. मग ते एखाद्या क्षेत्रात गाजवलेले असीम, वैयक्तिक कर्तृत्व असो किंवा सामाजिक कार्य असो, अनेक स्त्री-पुरुषांना प्रेरणा देणाऱ्या अशा नऊ

स्त्रियांची माहिती 'लोकसत्ता दुर्गा' या उपक्रमाअंतर्गत दरवर्षी प्रसिद्ध केली जाते. गेली सात वर्षे सुरू असलेल्या या उपक्रमातील ६३ 'दुर्गां'ची माहिती एकत्रितपणे नुकतीच कॉफी टेबल बुकच्या स्वरूपातही प्रसिद्ध करण्यात आली. यंदाच्या 'लोकसत्ता दुर्गा-२०२१' साठी नामांकने पाठवण्याचे आवाहन करण्यात येत असून २० सप्टेंबर २०२१ पर्यंत पाठवल्या जाणाऱ्या नामांकनांमधून तज्ज्ञ परीक्षकांतर्फे नऊ स्त्रियांची या पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे.

प्रायोजक

- मुख्य प्रायोजक : ग्रॅव्हिटस फाऊंडेशन
- सहप्रायोजक : महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)

हे महत्त्वाचे... उद्योग, शिक्षण, संशोधन, विज्ञान-तंत्रज्ञान, आरोग्य, क्रीडा, मनोरंजन, पर्यावरण संवर्धन, सामाजिक कार्य किंवा अन्य कोणतेही क्षेत्र असो, त्यात कर्तृत्व दाखवलेल्या तुमच्या परिचयातील 'दुर्गे'ची माहिती आपण पुरस्कारासाठी पाठवू शकता. ही माहिती मराठीत आणि नोंदी स्वरूपात फक्त एकदाच पाठवावी. या स्त्रियांचे काम प्रेरणादायी, विधायक, समाजावर सकारात्मक परिणाम करणारे आणि त्या-त्या क्षेत्रात उच्च स्थानी पोहोचलेले असावे.

माहिती कुठे पाठवाल? माहिती loksattanavdurga@gmail.com या ई-मेल आयडीवर वा टपालाने पुढील पत्त्यावर पाठवावी. 'लोकसत्ता- महापे कार्यालय, प्लॉट नं. ईएल-१३८, टीटीसी इंडस्ट्रिअल एरिया, महापे, नवी मुंबई- ४००७१०'. ई-मेलमध्ये आणि टपालाने पाठवल्या जाणाऱ्या पाकिटांवर 'लोकसत्ता दुर्गा पुरस्कार २०२१'साठी असा ठळक उल्लेख करावा. पुरस्कारप्राप्त दुर्गांची माहिती थेट 'लोकसत्ता'मध्ये ७ ऑक्टोबरपासून प्रसिद्ध होईल.

पुरस्काराविषयी... ही माहिती २० सप्टेंबर २०२१ पर्यंत 'लोकसत्ता'कडे ५०० शब्दांत पाठवावी. माहितीबरोबर त्या कर्तृत्ववान स्त्रीचे छायाचित्र, पूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक आणि ई-मेल आयडी पाठवणे आवश्यक. आलेल्या माहितीमधून परीक्षक समिती नऊ दुर्गांची निवड करेल. नवरात्रीत नऊ दिवस दररोज यातील एका दुर्गेची 'लोकसत्ता'तून ओळख करून दिली जाईल. त्यानंतर होणाऱ्या सोहळ्यात नामवंतांच्या हस्ते नवदुर्गांचा सन्मान केला जाईल.

५ नोव्हेंबरपासून नाट्यगृहे सुरू करण्याबाबत सरकार सकारात्मक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : सर्व रंगकर्मी व तंत्रज्ञांचे लसीकरण पूर्ण करून, करोनाविषयक सावधगिरी बाळगून ५ नोव्हेंबर या रंगभूमी दिनापासून राज्यातील नाट्यगृहे सुरू करण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक विचार करेल, असे संकेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रंगकर्मींबरोबरच्या बैठकीत शुक्रवारी दिले.

करोनासंबंधीचे विविध निर्बंध शिथिल होत असताना नाट्यगृहे सुरू करण्याबाबत सरकारने विचार करावा, या मागणीसाठी अभिनेते आदेश बांदेकर, अभिनेता-निर्माता सुबोध भावे, दिग्दर्शक विजय केंकरे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रसाद कांबळी, अभिनेता-दिग्दर्शक मंगेश कदम, मराठी नाट्य निर्माता संघाचे अध्यक्ष संतोष काणेकर, रंगमंच कामगार संघाचे अध्यक्ष किशोर वेल्हये, दिग्दर्शक विजय राणे यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची शुक्रवारी सकाळी 'वर्षा' या सरकारी निवासस्थानी भेट घेतली. सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख व ज्येष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते.

'करोनामुळे नाट्यगृहे बंद असल्याने या क्षेत्राशी संबंधित कलाकार व इतरांचे मोठे नुकसान होत आहे. अनेक उद्योग-व्यवसायांवरील निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. नाटक व लोककलांबाबतही तसाच निर्णय व्हावा. त्यासाठी सर्व कलाकार-तंत्रज्ञांचे लसीकरण पूर्ण करण्यासाठी मोहीम राबवणे व इतर जुळवाजुळवीला थोडा अवधी लागेल. ५ नोव्हेंबरला रंगभूमी दिन आहे. त्याचे औचित्य साधून राज्यात नाटक-लोककलांच्या सादरीकरणास राज्य सरकारने परवानगी द्यावी,' अशी भूमिका शिष्टमंडळातील रंगकर्मींनी मांडली. त्यावर लसीकरणासह सर्व प्रकारची खबरदारी घेतली जाणार असेल, तर या मागणीवर राज्य सरकार सकारात्मक विचार करेल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

'करोना आणखी काही काळ राहिला, तरी रंगकर्मी व नाट्यरसिकांच्या आरोग्य सुरक्षेची खबरदारी घेऊन नाटक-लोककला सुरू झाल्यास रंगकर्मी, तंत्रज्ञ, लोककलावंत यांच्यासाठी तो मोठा दिलासा ठरणार आहे,' असे अभिनेते आदेश बांदेकर यांनी सांगितले.

"आदेश बांदेकर यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबरोबर बैठक झाली. गेल्या वर्षीही ५ नोव्हेंबरला मराठी रंगभूमी दिनी राज्य सरकारने नाट्यगृहाचे दार उघडले होते. परंतु त्यानंतर तब्बल दोन महिन्यांनी नाटक रंगभूमीवर आले. म्हणूनच राज्य सरकारने नाट्यगृह सुरू करण्याबाबत लवकर भूमिका घ्यावी अशी आमची अपेक्षा होती. त्यानुसार मुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा झाली. यंदा ५ नोव्हेंबरला पुन्हा नाट्यगृहांचे दार उघडण्याबाबत सकारात्मक असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. - प्रसाद कांबळी, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

'एमपीएससी'ची आज संयुक्त पूर्वपरीक्षा

सहा वेळा पुढे ढकलल्यानंतर अखेर मुहूर्त; परीक्षार्थी-परीक्षा केंद्रांचा उच्चांक

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : करोनाच्या प्रादुर्भावामुळे लांबणीवर पडलेली महाराष्ट्र राज्य दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब संयुक्त पूर्वपरीक्षा २०२० साठी परीक्षार्थी आणि परीक्षा केंद्रांचा उच्चांक नोंदवला गेला आहे. सुमारे ३ लाख ८२ हजार परीक्षार्थी असून, १ हजार १६४ केंद्रांवर परीक्षा घेतली जाणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) संयुक्त पूर्वपरीक्षा एप्रिल २०२० मध्ये होणार होती. मात्र करोनाच्या प्रादुर्भावामुळे ही परीक्षा पुढे ढकलावी लागली. आता ती होत आहे. करोना परिस्थितीमुळे परीक्षा केंद्रांमध्ये वाढ करण्यात आली असून, प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोर पद्धतीने पालन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

आयोगातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार संयुक्त पूर्वपरीक्षेसाठी सुमारे साडेतीन लाख उमेदवारांची नोंदणी असते, तर सुमारे एक हजार केंद्रांवर परीक्षा घेतली जाते. मात्र संयुक्त पूर्वपरीक्षा २०२० साठी झालेली उमेदवारांची नोंदणी आणि परीक्षा केंद्रे सर्वाधिक आहेत.

आंदोलनानंतर...

करोनासह आरक्षणाच्या मुद्द्यासह वेगवेगळ्या कारणांनी एकूण सहा वेळा ही परीक्षा पुढे ढकलावी लागली. परीक्षा सतत लांबणीवर पडत असल्याने संतप्त उमेदवारांनी आंदोलनही केले होते. या पार्श्वभूमीवर शनिवारी (४ सप्टेंबर) राज्यभरातील परीक्षा केंद्रांवर आयोगामार्फत परीक्षा घेतली जाणार आहे.

सर्वाधिक नोंदणी...

या परीक्षेसाठी सुमारे ३ लाख ८२ हजार उमेदवारांनी नोंदणी केली आहे, तर १ हजार १६४ परीक्षा केंद्रे आहेत. सर्वाधिक सुमारे ४० हजार उमेदवार आणि सुमारे ११० परीक्षा केंद्रे पुणे जिल्ह्यात आहेत.

मुंबई-नागपूर प्रवासासाठी १,१५७ रुपये टोल

समृद्धी महामार्गावर १.६५ पैसे प्रति किमी दराने वसुली

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग प्रकल्पातील नागपूर ते शिर्डी हा ५२० किमी लांबीचा मार्ग डिसेंबर २०२१ पासून वाहतुकीसाठी उपलब्ध होणार आहे, तर पुढील वर्षी ७०० किमीचा संपूर्ण मार्ग वाहतुकीस खुला होणार आहे. मात्र या मार्गाचा वापर करण्यासाठी वाहनचालक वा प्रवाशांना टोलपोटी १ रुपया ६५ पैसे प्रति किमी दराने शुल्क भरावे लागणार आहे. हा टोलचा दर लक्षात घेता मुंबईहून नागपूरला जाण्यासाठी ७०० किमीच्या एकेरी प्रवासासाठी १,१५७ रुपये मोजावे लागणार आहेत.

मुंबई ते नागपूर रस्ते प्रवासासाठी १५ ते १६ तासांचा कालावधी लागतो. मुंबईहून नागपूरला आठ तासांत पोहोचता यावे यासाठी मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाची बांधणी करण्यात येत आहे. या प्रकल्पातील नागपूर ते शिर्डी टप्पा पूर्णत्वाच्या मार्गावर असून डिसेंबरअखेरीस हा टप्पा वाहतुकीत समाविष्ट होणार आहे. या मार्गावरून प्रवास करण्यासाठी किती टोल द्यावा लागेल, हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात होता. अखेर 'महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरणा'ने टोलचे दर जाहीर केले आहेत. समृद्धी महामार्गासाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार १ रुपया ६५ पैसे प्रति किमी दराने टोल आकारणी केली जाणार असल्याची माहिती 'एमएसआरडीसी'चे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार यांनी दिली.

केंद्राच्या २००८ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार टोल आकारणी करताना मुंबई ते नागपूर एकेरी प्रवासासाठी साधारणतः १,१५७ रुपये टोल द्यावा लागेल, अशी माहिती 'एमएसआरडीसी'चे सह व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली. या संपूर्ण मार्गावरील २४ प्रवेशद्वारांवर २४, तर मार्गाच्या सुरुवातीला नागपूरला एक आणि ठाण्यात एक असे मिळून एकूण २६ टोलनाके असणार आहेत. एकेरी प्रवासासाठी १,१५७ रुपये टोल लागणार असला, तरी जितका किमी प्रवास, तितकाच टोल आकारला जाणार आहे. म्हणजेच एखादी व्यक्ती औरंगाबाद ते नागपूर असा प्रवास करणार असेल, तर किमीप्रमाणे अंदाजे ६७५ रुपये टोल द्यावा लागेल, असेही गायकवाड यांनी स्पष्ट केले.

'मार्गाचा वापर कमी होण्याची शक्यता'

एकेरी प्रवासासाठी १,१५७ रुपये टोल वा प्रति किमी १ रुपया ६५ पैसे हा दर जास्तच आहे. जरी ही केंद्राची मार्गदर्शक तत्त्वे असली तरी ही आकारणी मरमसाट आहे. त्यामुळे या मार्गाचा वापर कमी केला जाण्याची शक्यता आहे. रेल्वे वा एसटीसाठी जसे सुरुवातीच्या काही किमीसाठी एक दर असतो आणि त्यानंतर पुढच्या अंतरासाठी तो कमी कमी होत जातो, तसा दर टोलसाठी आकारणे गरजेचे आहे, असे टोल अभ्यासक विवेक वेलणकर यांनी सांगितले.

डोंबिवलीत फेरीवाल्यांत हाणामारी

डोंबिवली : डोंबिवली पूर्वेच्या छेडा रस्त्यावर शुक्रवारी फेरीवाल्यांच्या दोन गटांत हाणामारी झाली.

चार परप्रांतीय फेरीवाल्यांनी काठीने फेरीवाल्यांच्या दुसऱ्या गटाला मारहाण केली. या प्रकरणी चार फेरीवाल्यांच्या विरोधात रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ते चौघेही फरार झाले आहेत.

ठाणे शहराप्रमाणे डोंबिवलीतही फेरीवाल्यांची मुजोरी वाढत चालली आहे. त्यातून हा प्रकार घडल्याचे समजते. परशुराम मल्याली, जयेश मल्याली, विष्णू मल्याली, सुभाष मल्याली या आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

छेडा रस्त्यावर गोळवली गावचे कमलाकर पाटील आणि त्यांची पत्नी भाजी विक्री करत होते. त्याच्या बाजुला परशुराम मल्याली आणि त्याचे चार साथीदार ओरडून भाजीविक्री करत होते. त्यांच्या ओरण्याचा व्यापारी, पादचाऱ्यांना त्रास होतो. ओरडून व्यवसाय करू नका, असे कमलाकर यांच्या पत्नीने चौघांना सांगितले. त्याचा त्यांना राग आला. त्यांनी कमलाकर पाटील यांना बेदम मारहाण केली. कमलाकर यांच्या नाकाला गंभीर दुखापत झाली आहे.

पालिकेची फेरीवाला हटाव पथके तात्पुरती कारवाई करून परत येतात. त्यानंतर फेरीवाले पुन्हा रस्त्यावर येऊन बसतात.

BRING IN YOUR NEXT BIG IDEA

CALLING ENTREPRENEURS OF MAHARASHTRA FOR THE NEXT GREAT SUCCESS STORY

Cornell maha60
ACCELERATOR PROGRAM

Cornell Maha 60 is a year-long online and in-class business Accelerator Programme offered and fully sponsored by Government of Maharashtra in partnership with Cornell University of USA, for 60 entrepreneurs per year.

EMPOWER YOURSELF, THE CORNELL WAY.

- Get trained in functional business skills
- Learn to develop the growth mindset
- Carry on your business while learning
- Network with Angel Investors
- Have industry experts as your mentors
- Cornell Certificate awarded on completion

Register before 30th September, 2021 at:
www.cornellmaha60.org

BENEFITS WORTH UPTO Rs. 50 LAC FOR PARTICIPANTS

Shri. Uddhav Thackeray
Hon'ble Chief Minister of Maharashtra

Shri. Subhash Desai
Hon'ble Minister, Department of Industries, Mining and Marathi Language

Shri. Dhananjay Munde
Hon'ble Minister, Department of Social Justice and Special Assistance

Adv. Shri. K. C. Padavi
Hon'ble Minister, Department of Tribal Development

Smt. Aditi Tatkare
Hon'ble Minister of State, Department of Industries and Mining

FULLY SPONSORED BY INDUSTRIES DEPARTMENT, GOVERNMENT OF MAHARASHTRA.

An Initiative By: Industries Department Government of Maharashtra

DGIPR /2021-22/1822

Khed Sinnar Expressway Limited

The IL&FS Financial Center, Plot C-22, G Block, Bandra Kurla Complex, Mumbai- 400051
Tel.: +91 022-26533333, Facsimile: +91 022-26523979,
E-mail: itnl.projectbids@itnlindia.com, Website: www.itnlindia.com
CIN: U45209MH2013PLC242133

KSEL/ADM/NEW/2022/Toll Auction _2 September 04, 2021

NOTICE INVITING TENDER (NIT)

Khed Sinnar Expressway Limited intends to invite Bids for **User Fee Collection at Hivargaon Pavsa Toll Plaza (Km 138.749 of NH-50) in the state of Maharashtra.** ***Bid document may be downloaded*** from the website ***www.itnlindia.com*** from ***September 04, 2021 (11:00 Hrs) to September 11, 2021 (11:00 Hrs).*** Bid must be submitted on or before ***September 11, 2021 (18:00 Hrs)*** to email id: ***itnl.projectbids@itnlindia.com***, via soft copy mode and hard copy to be sent to KSEL office address as mentioned in RFP. All the particulars and amendments related to this NIT can be viewed on the above said website. Interested agencies/firms may submit their bids as per eligibility criteria stated in the tender document. All the bids heavy in size can be submitted via link.

Authorized Signatory
Khed Sinnar Expressway Limited

जाहीर नोटिस

याद्वारे कळविण्यात येते की, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्या. मुंबई चे संचालक मंडळ निवडणुक सन २०२१-२०२६ साठी बँकेच्या सभासद संस्थांकडुन प्राप्त ठरावांची प्रारूप मतदार यादी व बँकेच्या वैयक्तिक सभासदांची यादी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्या, मुंबई या बँकेच्या www.mdccbank.com या वेबसाईटवर PDF स्वरुपात प्रसिध्द करण्यात आली आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक- ३.९.२०२१
ठिकाण - मुंबई

सही /-
(बाजीराव शिंदे)
जिल्हा सहकारी निबंधक तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई

पश्चिम रेल्वे

जागांच्या सर्वेक्षणाची कामे करणे

जाहिरात दिलेली निविदा सूचना क्र. डीवायसीई/ सी/ जीअँण्डएस/ सीसीजी/ क्वाड्रुपलिंग/ एसआयओबी-जीआयएमबी/ एफएलएस/०२ दि. ०३.०९.२०२१, डीवाय.सीई(सी) जनरल अॅण्ड सर्व्हे, स्टेशन बिल्डिंग, १ला माळा, चर्चगेट, मुंबई-४०० ०२० यांच्याकडून खालीलप्रमाणे जागांचे अंतिम सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी फक्त ई-निविदा पद्धतीद्वारे ई-निविदा मागविण्यात येत आहेत. **अ.क्र.:** १. **निविदा क्र.** डीवाय.सीई/ सी/ जीअँण्डएस/ सीजीएस/ क्वाड्रुपलिंग/ एसआयओबी-जीआयएमबी/ एफएलएस/०२. **कामाचे संक्षिप्त वर्णन:** समखियाली-गांधीधाम सेक्शन (५३.०० किमी) येथे क्वाड्रुपलिंगसाठी एफएलएस यासंदर्भात जागांचे अंतिम सर्वेक्षणाचे आयोजन करणे. यात खालील बाबींचा समावेश आहे : ड्रोन/ लायडर सर्व्हे, मातीचे परीक्षण, क्षेत्रातील हायड्रॉलॉजिकल व इतर माहिती मिळविणे, भूमी अभिलेख तयार करून सादर करणे, भूमी संपादनाचे प्रस्ताव, जमिनीच्या सीमांची आखणी करणे इ. तसेच ब्रिजेससाठी जीएडीज तपशीलवार एल सेक्शन तयार करून ती सादर करणे, योजना आणि ईएसपीज करण्याचे काम करणे. **निविदा मूल्य:** रु. १०३२२८६४.१५. **इरठे:** निरंक. **सादर करण्याची तारीख व वेळ:** २४.०९.२०२१ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **निविदा उघडण्याची तारीख व वेळ:** २४.०९.२०२१ रोजी १५.३० वाजता. **सूचना:** कृपया पात्रतेसाठी अटी आणि शर्ती यासाठी संबंधित वेबपेज www.ireps.gov.in येथे भेट द्यावी. 0391

आम्हाला लाईक करा www.facebook.com/WesternRly

IRB INFRASTRUCTURE DEVELOPERS LTD

नोंदणीकृत कार्यालय: ऑफिस क्र. ११ वा मजला/११०१, हिरानंदानी नॉलेज पार्क, टेक्नॉलॉजी स्ट्रीट, हील साईड अॅव्हेन्यु, पवई, मुंबई - ४०० ०७६.
दूरध्वनी नं. ०२२-६७३३ ६४०० • **फॅक्स नं.** ०२२-४०५३ ६६९९
वेबसाईट: www.irb.co.in • **ई-मेल आयडी:** grievances@irb.co.in
सीआयएन: L65910MH1998PLC115967

आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडच्या सभासदांसाठी सूचना

१. सदर सूचनेद्वारे सुचित करण्यात येत आहे की, आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडची तेवीसावी (२३वी) वार्षिक सर्वसाधारण सभा (ए.जी.एम.) गुरुवार, दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११ वाजता सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२०, ०२/२०२१, इतर सर्व लागू असलेले कायदे तसेच कॉर्पोरेट कामकाज मंत्रालय (एम.सी.ए.), भारत सरकार आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाने जारी केलेल्या परिपत्रकांनुसार व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ('व्हीसी'), सभेच्या सूचनेत समोर ठेवण्यात येणारे कामकाज पूर्ण करण्यासाठी आयोजित केली जाईल.

२. वरील परिपत्रकांची पूर्तता करत असताना, ए.जी.एम. ची सूचना व आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती, कंपनी/डिपॉझिटरी भागीदार(रां)कडे नोंदणीकृत असलेल्या सर्व सभासदांच्या ई-मेल पत्त्यांवर पाठवल्या जातील. प्रत्यक्ष स्वरूपात समभाग नसलेल्या सभासदांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांचे ई-मेल पत्ते आणि मोबाईल क्रमांक त्यांच्या संबंधित डिपॉझिटरींकडे त्यांच्या डिपॉझिटरी भागीदारांमार्फत पाठवावेत. प्रत्यक्ष स्वरूपात समभाग असलेल्या सभासदांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी आपले ई-मेल आणि मोबाईल क्रमांक कंपनीचे निबंधक आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आर.टी.ए.) केफिन टेक्नॉलॉजीज् प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे **einward.ris@kfintech.com** येथे पाठवावेत.

३. २३ व्या ए.जी.एम. ची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२०-२१ चा वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर **www.irb.co.in** येथे, शेअर बाजारची वेबसाइट म्हणजे बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** अनुक्रमे या वेबसाइटवर तसेच केफिन टेक्नॉलॉजीज् प्रायव्हेट लिमिटेडच्या **http://evoting.kfintech.com** येथे उपलब्ध करण्यात येईल.

४. सभासदांना ए.जी.एम. च्या सूचनेत नमूद केलेल्या कामकाजावर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे आपले मतदान करण्याची संधी उपलब्ध असेल. याशिवाय, कंपनी ए.जी.एम. दरम्यान ई-मतदान यंत्रणेद्वारे मतदानाची सुविधा देत आहे. दूरस्थ ई-मतदान/ ई-मतदान यांची तपशीलवार प्रक्रिया ए.जी.एम.च्या सूचनेत देण्यात येईल.

५. सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की, एम.सी.ए. ने दिनांक ५ मे, २०२० रोजी जारी केलेल्या सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक २०/२०२० आणि दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी जारी केलेल्या सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक २०/२०२१ च्या अनुषंगाने, कंपनीने कंपनीचा वार्षिक अहवाल प्राप्त करण्याच्या मर्यादित उद्दिष्टासाठी आणि वार्षिक सर्वसाधारण सभेसाठीच्या सूचनेची (दूरस्थ ई-मतदानसूचनांसह) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रक्रिया सुरू केली आहे आणि सदस्य या लिंकवर जाऊन तात्पुरत्या स्वरूपात आपले ई-मेल पत्ते अद्ययावत करू शकतात - **https://ris.kfintech.com/clientservices/mobilereg/mobileemailreg.aspx**

आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लि. साठी
स्वाक्षरी/-
मेहुल पटेल
कंपनी सेक्रेटरी

दिनांक : सप्टेंबर ३, २०२१
स्थळ : मुंबई